Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. ०२३१-२६९६१०१/२/३ WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/डीपी/वा.वे/423
दिनांक-०३/०२/२०२५.

प्रति,

१. सर्व परिरक्षक
इ.१२ वी व इ.१० वी फेब्रूवारी मार्च २०२५ परिक्षा

२. सर्व केंद्रसंचालक
इ.१२ वी व इ.१० वी फेब्रूवारी मार्च २०२५ परिक्षा

**विषय : फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या वाढीव वेळेबाबत**

संदर्भ : १. राज्य मंडळ, पुणे यांचे जा.क्र. रा.मं./परीक्षा-८/७८० दि.१५/०२/२०२३ चे पत्र
२. राज्य मंडळ, पुणे यांचे जा.क्र. रा.मं./परीक्षा-८/३८३ दि.२८/०१/२०२५ चे पत्र.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२३ परीक्षेपासून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या निर्धारीत वेळेनंतर १० मिनिटे वाढवून देण्यात येत आहे. त्यानुसार फेब्रुवारी-मार्च २०२५ परीक्षेसाठी देखील सकाळ सत्रात सकाळी ११.०० वाजता तसेच दुपार सत्रात दुपारी ३.०० वाजता परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वितरण करण्यात येईल व लेखनास प्रारंभ होईल. **सकाळी ११.०० वा.पूर्वी व दुपारी ३.०० वा. पूर्वी कोणत्याही परिस्थितीत प्रश्नपत्रिकांचे वितरण होणार नाही** याबाबत दक्षता घेण्यात यावी.

परीक्षा दालनात ज्या क्रमाने परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप होईल, त्याच क्रमाने परीक्षेचा कालावधी संपल्यानंतर लिखित उत्तरपत्रिका परीक्षार्थ्यांकडून गोळा करण्याच्या सूचना सर्व दालन पर्यवेक्षकांना आपणामार्फत देण्यात याव्यात. **पेपरच्या निर्धारीत वेळेनंतर शेवटी १० मिनिटे वेळ विद्यार्थ्यांना वाढवून देण्यात यावा.** सोबत परीक्षा कालावधीत द्यावयाचे घंटेचे सुधारीत नियोजन जोडण्यात आलेले आहे.त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

प्रत माहीतीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव
सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य,मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालये यांनी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु-मार्च-२०२५ परीक्षेसाठी विदयार्थ्यांना दयावयाच्या वाढीव वेळेबाबतची माहिती आपल्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविदयालयातील सर्व परीक्षार्थी,शिक्षक व पालक तसेच परीक्षेशी संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून दयावी.

माध्यामक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा

फेब्रुवारी–मार्च २०२५

परीक्षा कालावधीत द्यावयाच्या घंटेचे नियोजन

परीक्षा कालावधी –३ तास

सकाळी ११.०० ते दु. २.०० | दुपारी ३.०० ते ६.००

| वेळ | प्रयोजन | प्रकार | | वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १०.३० | वॉर्निंग | गजर | | २.३० | वॉर्निंग | गजर |
| १०.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल | | २.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ११.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल | | ३.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| १२.०० | एक तास समाप्त | दोन टोल | | ०४.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०१.०० | दोन तास समाप्त | दोन टोल | | ०५.०० | दोन तास समाप्त | दोन टोल |
| ०२.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल | | ०६.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०२.१० | लेखन समाप्त | गजर | | ०६.१० | लेखन समाप्त | गजर |

परीक्षा कालावधी –२ तास

सकाळी ११.०० ते दु. १.०० | दुपारी ३.०० ते ५.००

| वेळ | प्रयोजन | प्रकार | | वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १०.३० | वॉर्निंग | गजर | | २.३० | वॉर्निंग | गजर |
| १०.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल | | २.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ११.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल | | ३.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| १२.०० | एक तास समाप्त | दोन टोल | | ०४.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०१.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल | | ०५.०० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०१.१० | लेखन समाप्त | गजर | | ०५.१० | लेखन समाप्त | गजर |

परीक्षा कालावधी –२ तास ३० मिनिटे

सकाळी ११.०० ते दु. १.३० | दुपारी ३.०० ते ५.३०

| वेळ | प्रयोजन | प्रकार | | वेळ | प्रयोजन | प्रकार |
|---|---|---|---|---|---|---|
| १०.३० | वॉर्निंग | गजर | | २.३० | वॉर्निंग | गजर |
| १०.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल | | २.५० | उत्तरपत्रिका वाटप | दोन टोल |
| ११.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल | | ३.०० | प्रश्नपत्रिका वाटप लेखन प्रारंभ | दोन टोल |
| १२.०० | एक तास समाप्त | दोन टोल | | ०४.०० | एक तास समाप्त | दोन टोल |
| ०१.०० | दोन तास समाप्त | दोन टोल | | ०५.०० | दोन तास समाप्त | दोन टोल |
| ०१.३० | दहा मिनिटे बाकी | एक टोल | | ०५.३० | दहा मिनिटे बाकी | एक टोल |
| ०१.४० | लेखन समाप्त | गजर | | ०५.४० | लेखन समाप्त | गजर |

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे – ४.



D:\Govt Letter.docx